विशेष दिवाणी दावा क्र.१६/२०२५
खुशाल व इतर वि. भागवत व इतर

**नि.क्र. २३ खालील आदेश**

**१.** सदर अर्ज प्रतिवादी क्र.५ यांनी देऊन नमूद केले की, अद्यापी त्याला कागदपत्रे मिळाली नसल्याने मुळ दाव्यास कैफियत आणि तुर्तातुर्त ताकिदीस म्हणणे देता येत नाही त्यामुळे त्यास मुदत मिळावी.

**२.** अर्जास वादीने दिलेल्या म्हणण्यानुसार प्रतिवादी ५ ने म्हणणे देईपर्यंत वादीच्या लाभात तुर्तातुर्त ताकिद द्यावी. याच अनुषंगाने मागिल तारखेस अर्ज दिला आहे त्यामुळे मुदतवाढ देण्यास हरकत घेण्यात आली.

**३.** विधिज्ञ श्री देशमुख व श्री घोगरे यांचा युक्तीवाद ऐकला.

**४.** मुळ दावा हा चिरस्थायी मनाई हुकूम मिळण्यासाठी तसेच मालकीचे ज्ञापन मिळण्यासाठी आणि नोंदणीकृत खरेदीपत्रे बेकायदेशीर व शुन्यवत होऊन जाहीर होण्यासाठी दाखल केला आहे. या कामी पुर्वी झालेल्या दाव्यांचा व त्यावरील आदेशाचा उहापोह युक्तीवादात करण्यात आला.

**५.** प्रतिवादी १ ते ४ यांचे पुर्व हक्कदार लिंबाजी यांनी दाखल केलेला रे.दि.मु. क्र.२४१/१९८० हा दावा मंजूर झाल्यानंतर नामदार मुंबई उच्च न्यायालयाने त्याकामी अंतिम आदेश दिनांक १०.०२.१९९४ रोजी पारित केला. त्या आदेशाची अंमलबजावणी होण्यासाठी तेथुन पुढे १२ वर्षात दरखास्त दाखल न केल्याने प्रतिवादी १ ते ४ यांचे पुर्व हक्कदार यांचा दरखास्त अर्ज दाखल करण्यास झालेल्या उशिर मुदतीचा अर्ज फेटाळण्यात आला होता.

**६.** याच अनुषंगाने निशाणी ४/१४ लगतचा कागद दाखल केला आहे. या कागदावर विसंबुन वादींतर्फे युक्तीवादात, अद्यापही वादींचा कब्जा न्यायालयाने काढून घेतला नाही, असे सांगितले. त्या दरम्यान प्रतिवादी १ ते ४ यांनी प्रतिवादी ५ च्या लाभात खरेदीपत्रे

दिनांक १७.०७.२०२५ रोजी करून दावा मिळकत तबदिल केली. प्रतिवादी ५ हा या खरेदीपत्राने व त्याअनुषंगाने झालेल्या फेरफार उता-यान्वये दावा मिळकतीस त्याच्या लागलेल्या नावाचा गैरफायदा घेऊन वादीस दावा मिळकतीतून बेदखल करण्याची शक्यता त्यांनी वर्तवली.

**७.** प्रतिवादी ५ दाव्यात हजर झाल्यानंतर दाव्यास म्हणणे व कैफियत देणे आवश्यक आहे. यासाठी प्रतिवादी तर्फे विधिज्ञ देशमुख यांनी १० दिवसांची मुदत मागितली. दिनांक १९.१०.२०२५ ते २६.१०.२०२५ या काळात दिवाळी सुट्टयांमुळे न्यायालय बंद राहत आहे. त्यामुळे सदर सुट्ट्या संपल्यानंतर दिनांक २८.१०.२०२५ रोजीपर्यंत त्यांनी मुदत मागितली ती त्यांना देण्यात येते. मात्र जोपर्यंत दावा मिळकतीमध्ये प्रतिवादी ५ यांनी कोणताही हस्पक्षेप किंवा हरकत अडथळा करू नये अशी तुर्तातुर्त ताकिद प्रतिवादी ५ विरूध्द देण्यात येते. सदर ताकिदीचा अंमल निशाणी ५ या ताकिदीवर प्रतिवादी ५ याचे म्हणणे येईपर्यंत लागू राहिल. प्रतिवादी ५ तर्फे विधिज्ञ श्री देशमुख न्यायालयात हजर असल्याने आदेशाची समज प्रतिवादी ५ यांना वेगळी देण्याची गरज नाही.

स्वाक्षरीत/-

**दिनांक १७/१०/२०२५.**

**[एस.एन.सरडे]**
**दिवाणी न्यायाधीश व. स्तर, अहदमपूर.**